अंसा. क्र. २०८ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

**प्राधिकृत प्रकाशन**

मंगळवार, डिसेंबर १८, २००८/अग्रहायण २७, शके १९३०

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

# भाग चार-अ

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## वित्त विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २ डिसेंबर २००८

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक सेवाप्र-११.०७/प्र.क्र. ११६/१/कोषा (प्रशा-३).—भारताचे संविधान याच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, आणि याबाबतीत केलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा संलेख यांचे अधिक्रमण करून, महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे, लेखा व कोषागारे संचालनालय, वित्त विभाग, महाराष्ट्र शासन यातील वरिष्ठ लेखापाल, कनिष्ठ लेखापाल आणि लेखा-लिपिक या पदांवरील सेवाप्रवेशाचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहेत :—

१. या नियमांना, लेखा व कोषागारे, गट-क सेवा (सेवाप्रवेश) नियम, २००८ असे म्हणावे.

२. या नियमांत, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) " लेखा व कोषागारे, गट-क सेवा " याचा अर्थ, हे नियम अंमलात येण्याच्या दिनांकास अस्तित्वात असलेली उपलेखापाल या पदांसह वरिष्ठ लेखापाल, कनिष्ठ लेखापाल आणि लेखा-लिपिक



[किंमत : रुपये ७.००]

पदे असा आहे आणि त्यामध्ये, ज्या पदांवर या कर्मचाऱ्यांची प्रतिनियुक्ती किंवा बदली करण्यात येते अशी समतुल्य वेतनश्रेणीची इतर सर्व पदे यांचा समावेश होतो ;

(ख) " पदवी " याचा अर्थ, सांविधिक विद्यापीठाची पदवी, असा आहे ;

(ग) "सह/उप संचालक " याचा अर्थ, त्या त्या महसूल विभागाचा सह/उप संचालक, लेखा व कोषागारे, असा आहे ;

(घ) " वित्त विभाग " याचा अर्थ, महाराष्ट्र शासनाचा वित्त विभाग, असा आहे ;

(ङ) " शासन " याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(च) " उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा " याचा अर्थ, महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४१) अन्वये विभागीय मंडळाकडून घेण्यात येणारी उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा, असा आहे आणि त्यामध्ये, शासनाने त्यास समतुल्य म्हणून घोषित केलेली इतर कोणतीही परीक्षा याचा समावेश होतो ;

(छ) " माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा " याचा अर्थ, महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४१) अन्वये विभागीय मंडळाकडून घेण्यात येणारी माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा, असा आहे आणि त्यामध्ये, शासनाने त्यास समतुल्य म्हणून घोषित केलेली इतर कोणतीही परीक्षा याचा समावेश होतो ;

३. लेखा व कोषागारे, गट-क सेवेच्या प्रादेशिक संवर्गातील वरिष्ठ लेखापालाच्या पदावरील नियुक्ती, ज्यांनी त्या त्या प्रादेशिक संवर्गातील कनिष्ठ लेखापालाचे पद धारण केले असेल आणि त्या पदावर किमान तीन वर्षे इतकी नियमित सेवा केली असेल आणि ज्यांना महाराष्ट्र लेखा व स्थानिक निधी लेखा, गट-क सेवा विभागीय परीक्षा (भाग एक व दोन) उत्तीर्ण होण्यातून सूट मिळाली असेल किंवा ज्यांनी उक्त परीक्षा उत्तीर्ण केली असेल, अशा कनिष्ठ लेखापालाच्या त्या त्या प्रादेशिक संवर्गातील व्यक्तींमधून योग्यतेच्या अधीनतेने व ज्येष्ठतेच्या आधारे पदोन्नतीद्वारे करण्यात येईल.

४. लेखा व कोषागारे, गट-क सेवेच्या प्रादेशिक संवर्गातील कनिष्ठ लेखापालाच्या पदावरील नियुक्ती एकतर,—

(क) ज्यांनी लेखा व कोषागारे, गट-क सेवेच्या त्या त्या प्रादेशिक संवर्गातील लेखा-लिपिकाचे पद धारण केले असेल आणि ज्यांनी त्या लेखा-लिपिक संवर्गात तीन वर्षांपेक्षा कमी नाही इतकी नियमित सेवा केली असेल, आणि ज्यांना महाराष्ट्र लेखा व स्थानिक निधी लेखा, गट-क सेवा विभागीय परीक्षा (भाग एक) उत्तीर्ण होण्यातून सूट मिळाली असेल किंवा ज्यांनी उक्त परीक्षा उत्तीर्ण केली असेल, अशा लेखा-लिपिकाच्या त्या त्या प्रादेशिक संवर्गातील व्यक्तींमधून योग्यतेच्या अधीनतेने व ज्येष्ठतेच्या आधारे पदोन्नतीद्वारे करण्यात येईल ; किंवा

(ख) (एक) ज्याचे वय ३३ वर्षांपेक्षा अधिक नसेल :

परंतु, अगोदरच शासकीय सेवेत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, वयोमर्यादा पाच वर्षांपर्यंत शिथिल करता येईल ; आणि

(दोन) ज्यांनी पुढील कोणतीही अर्हता, म्हणजे,—

(क) किमान ५५ टक्के इतक्या गुणांसह वाणिज्य शाखेची पदवी ; किंवा

(ख) सांख्यिकी, गणित किंवा अर्थशास्त्र असा मुख्य विषय घेऊन किमान ५५ टक्के इतक्या गुणांसह कला शाखेची पदवी ; किंवा

(ग) सांख्यिकी किंवा गणित असा मुख्य विषय घेऊन किमान ५५ टक्के इतक्या गुणांसह विज्ञान शाखेची पदवी धारण केली असेल ; किंवा

(घ) भारतीय परिव्यय व कार्य लेखापाल संस्थेकडून घेण्यात येणारी परिव्यय लेखाशास्त्राची अंतिम परीक्षा उत्तीर्ण केली असेल ; किंवा

(ड) व्यवसाय प्रशासनाची पदवी धारण केली असेल ; किंवा

(च) कोणतीही पदवी आणि सनदी लेखापालाची मध्यम स्तरीय परीक्षा उत्तीर्ण केली असेल ; किंवा

(छ) संगणक तंत्रज्ञान किंवा संगणकशास्त्र किंवा माहिती तंत्रज्ञान यातील विशेषज्ञतेसह अभियांत्रिकीमधील पदवी धारण केली असेल, अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल :

परंतु, निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या मते, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्या उमेदवारांकरिता राखून ठेवलेली रिक्त पदे भरण्यासाठी उपखंड (क), (ख) आणि (ग) यांमध्ये नमूद केलेली किमान आवश्यक अर्हता धारण करणारे पुरेसे उमेदवार उपलब्ध नसतील तर, नियुक्ती प्राधिकाऱ्यास, अशा निवडीच्या बाबतीत, गुणांची अट ५० टक्क्यांपर्यंत शिथिल करता येईल, आणि अशा जाती किंवा जमातीच्या योग्य उमेदवारांची निवड करता येईल.

५. लेखा व कोषागारे, गट-क सेवेच्या प्रादेशिक संवर्गातील लेखा-लिपिकाच्या पदावरील नियुक्ती एकतर,—

(क) त्या त्या महसूल विभागाच्या सह/उप संचालक, लेखा व कोषागारे यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील विभिन्न कार्यालयातील गट ' ड ' मधील पद धारण केलेल्या व गट ' ड ' मधील त्या पदावर तीन वर्षापेक्षा कमी नाही इतकी नियमित सेवा झालेल्या आणि माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केलेल्या आणि या नियमाच्या उप खंड (ख) (२) मध्ये नमूद केलेली अर्हता धारण केलेल्या व्यक्तींमधून योग्यतेच्या अधीनतेने व ज्येष्ठतेच्या आधारे पदोन्नतीद्वारे करण्यात येईल ; किंवा

(ख) (१) ज्याचे वय ३३ वर्षापेक्षा अधिक नसेल :

परंतु, अगोदरच शासकीय सेवेत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, वयोमर्यादा पाच वर्षापर्यंत शिथिल करता येईल ; आणि

(२) ज्यांनी किमान ५५ टक्के गुणांसह माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा अशी अर्हता धारण केली असेल :

परंतु, पुढील उच्च अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांना अधिक पसंती देण्यात येईल,—

(एक) वाणिज्य विषयासह उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा ; किंवा

(दोन) वाणिज्य शाखेची पदवी ; किंवा

(तीन) सांख्यिकी, गणित किंवा अर्थशास्त्र असा मुख्य विषय घेऊन कला शाखेची पदवी ; किंवा

(चार) सांख्यिकी किंवा गणित असा मुख्य विषय घेऊन विज्ञान शाखेची पदवी ; किंवा

(पाच) भारतीय परिव्यय व कार्य लेखापाल संस्थेकडून घेण्यात येणारी परिव्यय लेखाशास्त्राची अंतिम परीक्षा उत्तीर्ण केली असेल ; किंवा

(सहा) व्यवसाय प्रशासनाची पदवी ; किंवा

(सात) कोणतीही पदवी आणि सनदी लेखापालाची मध्यमस्तरीय परीक्षा उत्तीर्ण केली असेल :

परंतु, निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या मते, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्या उमेदवारांकरिता राखून ठेवलेली रिक्त पदे भरण्यासाठी उप खंड (ख) (२) मध्ये नमूद केलेली किमान आवश्यक अर्हता धारण करणारे पुरेसे उमेदवार उपलब्ध नसतील तर, नियुक्ती प्राधिकाऱ्यास, अशा निवडीच्या बाबतीत, गुणांची अट ५० टक्क्यांपर्यंत शिथिल करता येईल आणि अशा जाती किंवा जमातीच्या योग्य उमेदवारांची निवड करता येईल ; आणि

(३) ज्यांनी मराठी टंकलेखन प्रति मिनिट ३० शब्द किंवा इंग्रजी टंकलेखन प्रति मिनिट ४० शब्द इतक्या वेगाचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र धारण केले असेल, अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल.

६. नियम ४ व ५ यामध्ये नमूद केलेल्या पदांवर पदोन्नतीद्वारे आणि नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या नियुक्त्या, अनुक्रमे १:२ आणि १:४ या प्रमाणात करण्यात येतील :

परंतु, पदोन्नतीसाठी पुरेसे पात्र उमेदवार उपलब्ध नसतील तर, नियुक्ती प्राधिकाऱ्यास, नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या नियुक्त्यांचे प्रमाण वाढविता येईल.

७. नियम ३, ४ किंवा ५ यांमध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार मराठी व हिंदी भाषा परीक्षा अगोदर उत्तीर्ण केलेल्या नसतील, किंवा त्या उत्तीर्ण करण्यापासून त्याला सूट मिळाली नसेल तर, त्या परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक असेल.

८. नियम ४ आणि ५ यामध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, महाराष्ट्र लेखा व स्थानिक निधी लेखा, गट-क सेवा विभागीय परीक्षा, अनुक्रमे (भाग-एक आणि दोन) व (भाग-एक) ही. विभागीय परीक्षा अगोदर उत्तीर्ण केली नसेल तर, अशी विभागीय परीक्षा विहित कालावधीच्या/संधीच्या आत उत्तीर्ण करणे आवश्यक असेल.

९. नियम ३, ४ किंवा ५ यामध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाकडून विहित करण्यात आले असेल असे संगणक हाताळण्याबाबतचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे.

१०. नियम ३, ४ किंवा ५ यामध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, लेखा व कोषागारे संचालनालयाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील त्या त्या महसूल विभागातील कार्यालयांत, किंवा स्थानिक निधी लेखा विभाग, यातील पदांसह त्या त्या महसूल विभागातील इतर शासकीय कार्यालयांमधील समतुल्य वेतन श्रेणीच्या इतर कोणत्याही पदांवर बदली केली जाण्यास पात्र असेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सुधीर श्रीवास्तव,

शासनाचे सचिव (वित्तीय सुधारणा).

प्रत :

राज्यपाल यांचे सचिव.

मुख्य सचिव.

मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव.

उप मुख्यमंत्र्यांचे सचिव.

मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव.

राज्यमंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव.

प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग.

प्रधान सचिव, विधि व न्याय विभाग.

संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई.

अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

सर्व विभागीय सह/उप संचालक, लेखा व कोषागारे.

सर्व कोषागार अधिकारी.

संचालक, भाषा संचालनालय, मुंबई (५ प्रती).

कार्यासन अधिकारी, कार्यासन-१२, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.

कार्यासन अधिकारी, ब शाखा, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.

निवड नस्ती (कोषा. प्रशा. ३).

## वित्त विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २ डिसेंबर २००८

### अधिसूचना

**भारताचे संविधान.**

क्रमांक सेवाप्र-११.०७/प्र.क्र. १९६/२/कोषा (प्रशा-३).—भारताचे संविधान याच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, आणि याबाबतीत केलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा संलेख यांचे अधिक्रमण करून,महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे, स्थानिक निधी लेखा, वित्त विभाग, महाराष्ट्र शासन यातील वरिष्ठ लेखापरीक्षक, कनिष्ठ लेखापरीक्षक, आणि लेखापरीक्षा-लिपिक या पदांवरील सेवाप्रवेशाचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहेत :—

१. या नियमांना, स्थानिक निधी लेखा, गट-क सेवा (सेवाप्रवेश) नियम, २००८, असे म्हणावे.

२. या नियमांत, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) " स्थानिक निधी लेखा, गट-क सेवा " याचा अर्थ, वरिष्ठ लेखापरीक्षक, कनिष्ठ लेखापरीक्षक आणि लेखापरीक्षा-लिपिक, असा आहे आणि त्यामध्ये, या कर्मचाऱ्यांची प्रतिनियुक्ती किंवा बदली करण्यात येते अशा समतुल्य वेतनश्रेणीची इतर सर्व पदे यांचा समावेश होतो ;

(ख) " पदवी " याचा अर्थ, सांविधिक विद्यापीठाची पदवी, असा आहे ;

(ग) " सह मुख्य लेखापरीक्षक/उप मुख्य लेखापरीक्षक (वरिष्ठ) " याचा अर्थ, त्या त्या महसूल विभागाचा सह मुख्य लेखा परीक्षक/उप मुख्य लेखापरीक्षक (वरिष्ठ), स्थानिक निधी लेखा, असा आहे ;

(घ) " वित्त विभाग " याचा अर्थ, महाराष्ट्र शासनाचा वित्त विभाग, असा आहे ;

(ङ) " शासन " याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(च) " उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा " याचा अर्थ, महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४१) अन्वये विभागीय मंडळाकडून घेण्यात येणारी उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा, असा आहे आणि त्यामध्ये, शासनाने त्यास समतुल्य म्हणून घोषित केलेली इतर कोणतीही परीक्षा याचा समावेश होतो ;

(छ) " माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा " याचा अर्थ, महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४१) अन्वये विभागीय मंडळाकडून घेण्यात येणारी माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा, असा आहे आणि त्यामध्ये, शासनाने त्यास समतुल्य म्हणून घोषित केलेली इतर कोणतीही परीक्षा याचा समावेश होतो.

३. स्थानिक निधी लेखा, गट-क सेवेच्या प्रादेशिक संवर्गातील वरिष्ठ लेखापरीक्षकाच्या पदावरील नियुक्ती, ज्यांनी त्या त्या प्रादेशिक संवर्गातील कनिष्ठ लेखापरीक्षकाचे पद धारण केले असेल आणि त्या पदावर किमान तीन वर्षे इतकी नियमित सेवा केली असेल आणि ज्यांना महाराष्ट्र लेखा व स्थानिक निधी लेखा, गट-क सेवा विभागीय परीक्षा (भाग एक व दोन), उत्तीर्ण होण्यातून सूट मिळाली असेल किंवा ज्यांनी

उक्त परीक्षा उत्तीर्ण केली असेल, अशा कनिष्ठ लेखापरीक्षकाच्या त्या त्या प्रादेशिक संवर्गातील व्यक्तींमधून योग्यतेच्या अधीनतेने व ज्येष्ठतेच्या आधारे पदोन्नतीद्वारे करण्यात येईल.

४. स्थानिक निधी लेखा, गट-क सेवेच्या प्रादेशिक संवर्गातील कनिष्ठ लेखापरीक्षकाच्या पदावरील नियुक्ती एकतर,—

(क) ज्यांनी स्थानिक निधी लेखा, गट-क सेवेच्या त्या त्या प्रादेशिक संवर्गातील लेखापरीक्षा-लिपिकाचे पद धारण केले असेल आणि ज्यांनी त्या लेखापरीक्षा-लिपिक संवर्गात तीन वर्षांपेक्षा कमी नाही इतकी नियमित सेवा केली असेल, आणि ज्यांना महाराष्ट्र लेखा व स्थानिक निधी लेखा, गट-क सेवा विभागीय परीक्षा (भाग एक) उत्तीर्ण होण्यातून सूट मिळाली असेल किंवा ज्यांनी उक्त परीक्षा उत्तीर्ण केली असेल, अशा लेखापरीक्षा-लिपिकाच्या त्या त्या प्रादेशिक संवर्गातील व्यक्तींमधून योग्यतेच्या अधीनतेने व ज्येष्ठतेच्या आधारे पदोन्नतीद्वारे करण्यात येईल ; किंवा

(ख) (एक) ज्याचे वय ३३ वर्षांपेक्षा अधिक नसेल :

परंतु, अगोदरच शासकीय सेवेत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, वयोमर्यादा पाच वर्षांपर्यंत शिथिल करता येईल ; आणि

(दोन) ज्यांनी पुढील कोणतीही अर्हता, म्हणजे,—

(क) किमान ५५ टक्के इतक्या गुणांसह वाणिज्य शाखेची पदवी ; किंवा

(ख) सांख्यिकी, गणित किंवा अर्थशास्त्र असा मुख्य विषय घेऊन किमान ५५ टक्के इतक्या गुणांसह कला शाखेची पदवी ; किंवा

(ग) सांख्यिकी किंवा गणित असा मुख्य विषय घेऊन किमान ५५ टक्के इतक्या गुणांसह विज्ञान शाखेची पदवी धारण केली असेल ; किंवा

(घ) भारतीय परिव्यय व कार्य लेखापाल संस्थेकडून घेण्यात येणारी परिव्यय लेखाशास्त्राची अंतिम परीक्षा उत्तीर्ण केली असेल ; किंवा

(ङ) व्यवसाय प्रशासनाची पदवी धारण केली असेल ; किंवा

(च) कोणतीही पदवी आणि सनदी लेखापालाची मध्यम स्तरीय परीक्षा उत्तीर्ण केली असेल ; किंवा

(छ) संगणक तंत्रज्ञान किंवा संगणकशास्त्र किंवा माहिती तंत्रज्ञान यातील विशेषज्ञतेसह अभियांत्रिकीमधील पदवी धारण केली असेल, अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल :

परंतु, निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या मते, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्या उमेदवारांकरिता राखून ठेवलेली रिक्त पदे भरण्यासाठी, उप-खंड (क), (ख) आणि (ग) यांमध्ये नमूद केलेली किमान आवश्यक अर्हता धारण करणारे पुरेसे उमेदवार उपलब्ध नसतील तर, नियुक्ती प्राधिकाऱ्यास, अशा निवडीच्या बाबतीत, गुणांची अट ५० टक्क्यांपर्यंत शिथिल करता येईल आणि अशा जाती किंवा जमातीच्या योग्य उमेदवारांची निवड करता येईल.

५. स्थानिक निधी लेखा, गट-क सेवेच्या प्रादेशिक संवर्गातील लेखापरीक्षा-लिपिकाच्या पदावरील नियुक्ती एकतर,—

(क) त्या त्या महसूल विभागाच्या सह मुख्य लेखापरीक्षक/उप मुख्य लेखापरीक्षक (वरिष्ठ), स्थानिक निधी लेखा यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील विभिन्न कार्यालयातील गट-' ड ' मधील पद धारण केलेल्या व गट-' ड ' मधील पदावर तीन वर्षांपेक्षा कमी नाही इतकी नियमित सेवा झालेल्या आणि माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केलेल्या आणि या नियमाच्या उप खंड (ख) (३) मध्ये नमूद केलेली अर्हता धारण केलेल्या व्यक्तिंमधून योग्यतेच्या अधीनतेने व ज्येष्ठतेच्या आधारे पदोन्नतीद्वारे करण्यात येईल ; किंवा

(ख) (१) ज्याचे वय ३३ वर्षांपेक्षा अधिक नसेल :

परंतु, अगोदरच शासकीय सेवेत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, वयोमर्यादा पाच वर्षांपर्यंत शिथिल करता येईल ; आणि

(२) ज्यांनी किमान ५५ टक्के गुणांसह माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा अशी अर्हता धारण केली असेल :

परंतु, पुढील उच्च अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांना अधिक पसंती देण्यात येईल,—

(एक) वाणिज्य हा एक विषय घेऊन उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा ; किंवा

(दोन) वाणिज्य शाखेची पदवी ; किंवा

(तीन) सांख्यिकी, गणित किंवा अर्थशास्त्र असा मुख्य विषय घेऊन कला शाखेची पदवी ; किंवा

(चार) सांख्यिकी किंवा गणित असा मुख्य विषय घेऊन विज्ञान शाखेची पदवी ; किंवा

(पाच) भारतीय परिव्यय व कार्य लेखापाल संस्थेकडून घेण्यात येणारी परिव्यय लेखाशास्त्राची अंतिम परीक्षा उत्तीर्ण केली असेल ; किंवा

(सहा) व्यवसाय प्रशासनाची पदवी ; किंवा

(सात) कोणतीही पदवी आणि सनदी लेखापालाची मध्यम स्तरीय परीक्षा उत्तीर्ण केली असेल :

परंतु, निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या मते, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्या उमेदवारांकरिता राखून ठेवलेली रिक्त पदे भरण्यासाठी उप-खंड (ख) (२) मध्ये नमूद केलेली किमान आवश्यक अर्हता धारण करणारे पुरेसे उमेदवार उपलब्ध नसतील तर, नियुक्ती प्राधिकाऱ्यास, अशा निवडीच्या बाबतीत, गुणांची अट ५० टक्क्यांपर्यंत शिथिल करता येईल आणि अशा जाती किंवा जमातीच्या योग्य उमेदवारांची निवड करता येईल ; आणि

(३) ज्यांनी मराठी टंकलेखन प्रति मिनिट ३० शब्द किंवा इंग्रजी टंकलेखन प्रति मिनिट ४० शब्द इतक्या वेगाचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र धारण केले असेल, अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल.

६. नियम ४ व ५ यामध्ये नमूद केलेल्या पदांवर पदोन्नतीद्वारे आणि नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या नियुक्त्या, अनुक्रमे १:२ आणि १:४ या प्रमाणात करण्यात येतील :

परंतु , पदोन्नतीसाठी पुरेसे पात्र उमेदवार उपलब्ध नसतील तर, नियुक्ती प्राधिकाऱ्यास, नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या नियुक्त्यांचे प्रमाण वाढविता येईल.

७. नियम ३, ४ किंवा ५ यांमध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार मराठी व हिंदी भाषा परीक्षा अगोदर उत्तीर्ण केलेल्या नसतील, किंवा त्या उत्तीर्ण करण्यापासून त्याला सूट मिळाली नसेल तर, त्या परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक असेल.

८. नियम ४ आणि ५ यामध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, महाराष्ट्र लेखा व स्थानिक निधी लेखा, गट-क सेवा विभागीय परीक्षा, अनुक्रमे (भाग-एक आणि दोन) व (भाग-एक) ही विभागीय परीक्षा अगोदर उत्तीर्ण केलेली नसेल तर, अशी विभागीय परीक्षा विहित कालावधीच्या/संधीच्या आत उत्तीर्ण करणे आवश्यक असेल.

९. नियम ३, ४ किंवा ५ यांमध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाकडून विहित करण्यात आले असेल असे संगणक हाताळण्याबाबतचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे.

१०. नियम ३, ४ किंवा ५ यांमध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील त्या त्या महसूल विभागातील कार्यालयांत, किंवा लेखा व कोषागारे यांतील पदांसह त्या त्या महसूल विभागातील इतर शासकीय कार्यालयांमधील समतुल्य वेतनश्रेणीच्या इतर कोणत्याही पदांवर बदली केली जाण्यास पात्र असेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सुधीर श्रीवास्तव,**
शासनाचे सचिव (वित्तीय सुधारणा).

प्रत

राज्यपाल यांचे सचिव.

मुख्य सचिव.

मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव.

उप मुख्यमंत्र्यांचे सचिव.

मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव.

राज्यमंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव.

प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग.

प्रधान सचिव, विधि व न्याय विभाग.

संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ०२१.

मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई,

अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

सर्व विभागीय सह/उप संचालक, लेखा व कोषागारे.

सर्व सह मुख्य लेखापरीक्षक/उप मुख्य लेखापरीक्षक (वरिष्ठ), स्थानिक निधी लेखा

सर्व उप मुख्य लेखापरीक्षक (कनिष्ठ), स्थानिक निधी लेखा

सर्व कोषागार अधिकारी.

संचालक, भाषा संचालनालय, मुंबई (५ प्रती).

कार्यासन अधिकारी, कार्यासन-१२, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.

कार्यासन अधिकारी, ब-शाखा, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.

निवड नस्ती (कोषा. प्रशा. ३).

RNI No. MAHBIL /2009/31733

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–अ

वर्ष ४, अंक १६६] मंगळवार, डिसेंबर ११, २०१८ / अग्रहायण २०, शके १९४० [पृष्ठे २, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक २२४**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त), नियम व आदेश.**

**वित्त विभाग**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ११ डिसेंबर २०१८

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक सेवाप्र.२०१८/प्र.क्र.१४३/कोषा (प्रशा-३).—भारताचे संविधानातील **अनुच्छेद ३०९** च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे, महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाच्या अंतर्गत असणाऱ्या लेखा व कोषागारे संचालनालयामधील लेखा व कोषागारे, गट-क सेवा (सेवाप्रवेश) नियम, २००८ मध्ये पुढील सुधारणा करीत आहेत :—

१. या नियमांना, लेखा व कोषागारे, गट-क सेवा (सेवाप्रवेश) (सुधारणा) नियम २०१८ असे म्हणावे.

२. लेखा व कोषागारे, गट-क सेवा (सेवाप्रवेश) नियम, २००८ मधील नियम ६ **पुढीलप्रमाणे** सुधारण्यात येत आहे :—

" **नियम-६**.—नियम ४ मध्ये नमूद केलेल्या पदांवर पदोन्नतीने आणि नामनिर्देशनाने करावयाच्या नियुक्त्या १:१ व नियम ५ मध्ये नमूद केलेल्या पदांवर पदोन्नतीने आणि नामनिर्देशनाने करावयाच्या नियुक्त्या १:४ याप्रमाणात करण्यात येतील. "

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

नितीन गद्रे,
शासनाचे प्रधान सचिव.

आस्था-४ शाखा

58

**महाराष्ट्र राज्यातील जिल्हा कोषागारांतील तसेच उप-कोषागारांतील लिपिकवर्गीय व पर्यवेक्षी कर्मचाऱ्यांच्या कामाचे प्रमाणक/निकष निश्चित करण्याबाबत—**

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग

**निर्णय क्रमांक डीएटी. ११८४/सीआर-१३८/८४/एडीएम-४**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,**
**दिनांक २४ मे १९८५/ज्येष्ठ ३, शके १९०७**

**वाचावे :**

(१) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक डीएटी. १८८२/सीआर-३३९/८२/एडीएम-४, दिनांक २६ मार्च १९८४ व दिनांक १९ जून १९८४ (अभ्यास समितीची नियुक्ती).
(२) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई, यांचे दिनांक २६ जून १९८४ चे पत्र (अभ्यास समितीचा अहवाल शासनास सादर).
(३) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई, यांचे पत्र क्रमांक एमएएस. १०८२/८७९४/८४/इ-४/११८२, दिनांक १८ डिसेंबर १९८४.
(४) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक पीसीआर. १२७९/ सीआर-२६२/एसईआर-१०, दिनांक १० मे १९७९ (इंग्रजी टंकलेखकाच्या कामाचे प्रमाणक व अनुज्ञेय विशेष वेतन).
(५) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक पीसीआर. १२७९/सीआर-८२४/एसईआर-१०, दिनांक १४ नोव्हेंबर १९७९ (मराठी टंकलेखकाच्या कामाचे प्रमाणक व अनुज्ञेय विशेष वेतन).
(६) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक टीआरडब्ल्यू. १३८१/सीआर-५८५/एडीएम-२, दिनांक ५ मे १९८२ (निवृत्तिवेतन प्रदानविषयक कामासाठी कर्मचारी नेमण्यासाठीचे निकष).
(७) मुंबई कोषागार नियम, १९६० व महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ मधील परिशिष्ट ४.
(८) शासन ज्ञापन, वित्त विभाग, क्रमांक डीएटी. २३६६/२७८६/६६/बारा, दिनांक ११ सप्टेंबर १९६६ [वरिष्ठ लिपिक व कनिष्ठ लिपिकांचे प्रमाण (रेशो) ठरविण्याबाबत].

जिल्हास्तरीय कोषागार कार्यालये व तालुकास्तरीय उप-कोषागार कार्यालये ही राज्याच्या एकंदर अर्थव्यवस्थेमध्ये अत्यंत महत्त्वाची अंगभूत पाया घटक आहेत. आदर्श कोषागार कसे असावे व त्यासाठी कर्मचारीवृंद देताना तो कोणत्या सूत्रात बांधलेला असावा हे, "महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८" च्या परिशिष्ट ४ मध्ये नमूद करण्यात आलेले आहे. गेल्या तीस वर्षांच्या कालावधीमध्ये व मुख्यतः दिनांक १ मे १९६० पासून महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर योजनाबद्ध विकासाच्या पर्वास प्रारंभ झाल्यावर शासनाच्या उप-क्रमांमध्ये, विविधतेच्या व परिमाणाच्या अशा दोन्ही दृष्टीने, प्रचंड असामान्य व लक्षणीय वाढ झालेली आहे व या वाढीचा वेग प्रतिवर्षी वाढतच आहे. शासकीय कार्यालये व त्यांमधील अधिकारी व कर्मचारी यांची संख्या गेल्या २५–३० वर्षांत अनेक पटीने वाढलेली आहे व ही वाढ सतत होतच आहे. कोषागार कार्यालयांचा विकासाच्या कार्याच्या कार्यान्वितेशी प्रत्यक्ष संबंध नसला तरी शासनाच्या विविध कार्यालयांतील कर्मचाऱ्यांची संख्या वाढली किंवा नवीन उपक्रम हाती घेण्यात आले की सांकेतिक कार्ये ( Conventional Matters ) पार पाडणाऱ्या, परंतु अर्थव्यवस्थेतील अत्यंत महत्त्वाची अशी कालबद्ध स्वरूपाची कामे विहित नियमानुसार व विहित पद्धतीने करणाऱ्या कोषागारातील कामे ओघाने वाढतातच. गेल्या दशकामध्ये कोषागार कार्यालयांतील कामकाज अनेक पटीने वाढले आहे. सत्तेच्या विकेंद्रीकरणाच्या हेतूने व लोकाभिमुख प्रशासनाच्या दृष्टीने शासनाच्या मंत्रालयीन विभागांमध्ये, विभागीय कार्यालयांमध्ये, जिल्हा कार्यालयांमध्ये तसेच तालुका कार्यालयांमध्ये लक्षणीय वाढ झालेली आहे. राज्याच्या अंदाजपत्रकातील वित्तीय तरतुदींमध्येही अनेक पटीने वाढ झालेली आहे.

कोषागार कार्यालयांतील कामाच्या प्रमाणात अनेक पटीने व अनेक दिशांनी वाढ झालेली असली तरीसुद्धा सदर कामाच्या वाढीच्या प्रमाणात कोषागार कार्यालयांतील कर्मचाऱ्यांच्या संख्येत झालेली वाढ अगदी नगण्य आहे व तीही एतदर्थ (तदर्थ) आधारावर झालेली आहे. काही अपवाद वगळता राज्यातील सर्व कोषागार कार्यालयांना गेल्या १० वर्षांत वाढलेल्या कामाच्या व्यापाचा विचार करून अधिक कर्मचारीवृंद देण्यात आलेला नाही. कोषागार कार्यालयांतील कामामध्ये भरमसाठ वाढ होऊनही त्या मानाने कर्मचारीवृंदामध्ये वेळोवेळी वाढ न झाल्यामुळे सध्याच्या तुटपुंज्या कर्मचारीवृंदावर साहजिकच असह्य ताण पडत आहे. त्यांना जादा वेळ काम करावे लागत आहे व त्यांना बहुतांशी सुट्ट्यांचा लाभ घेता येत नाही. अशी परिस्थिती राहती असल्याचे शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आले आहे. कोषागारातील कामकाजाचे महत्त्व, त्याची पद्धती व त्याचे कालबद्ध स्वरूप लक्षात घेता कोषागार कार्यालयातील अनेक पटीने वाढलेल्या कामावर विपरीत परिणाम होत आहे. पगारांची व इतर देयके ही वेळच्या वेळी पारित होत नाहीत. महालेखापालांना पाठवावयाचे हिशेबही वेळच्या वेळी पाठवणे जमत नाहीत. महिन्यातून दोन वेळा पाठवावयाचे हिशेब, महिन्यातून प्रत्येक शासकीय कार्यालयाची पारित करावयाची विविध प्रकारची देयके, निवृत्तिवेतन प्रदाने व इतर आनुषंगिक प्रदाने यांच्या संख्येचा आढावा घेता कोषागार कार्यालयांतील विविध शाखांमधील कर्मचारीवृंदांमध्ये पुरेशी वाढ करणे अत्यावश्यक झालेले आहे. कर्मचारीवृंदामध्ये वाढ करण्याचे प्रस्ताव, अशा प्रकारच्या वाढीसाठी निकष निश्चित करण्यात आलेले नसल्यामुळे, मान्य होऊ शकले नाहीत.

कोषागार कार्यालयांतील कर्मचारीवृंदामध्ये वाढ करण्याची नितांत आवश्यकता लक्षात घेऊन कोषागार कार्यालयांतील सर्व शाखांमधील सर्व प्रकारच्या कामकाजाच्या बाबींचे निकष निश्चित करण्यासाठी शासनाने दिनांक २६ मार्च १९८४ च्या शासन निर्णयान्वये ७ अधिकाऱ्यांची एक अभ्यास समिती गठित केली होती. त्या समितीने कोषागार व उप-कोषागार कार्यालयांतील विविध शाखांच्या कामांचा कार्याभ्यास तंत्राचे पालन करून विचार केला. कामकाजाचे घटक निश्चित केले. ते काम नियमानुसार करण्यासाठी किती वेळ लागेल व त्या कामाचा वेग व व्याप कसा राहील यांसारख्या गोष्टींची प्रत्यक्ष पाहणी व तपासणी करून सम्यक विचार केला व अत्यंत काटेकोरपणे व व्यावहारिक दृष्टिकोनातून ठरविलेल्या निष्कर्षांवर आधारित अहवाल शासनाला संचालकांच्या दिनांक २६ जून १९८४ च्या पत्रासोबत

सादर केला होता. सदर अहवालाचा सर्वंकष विचार करून कोषागारांतील व उप-कोषागारांतील पर्यवेक्षक व इतर लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांच्या कामाचे प्रमाणक/निकष निश्चित करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**निर्णय.**—दिनांक २६ मार्च १९८४ च्या उपरोक्त शासन निर्णयान्वये गठित करण्यात आलेल्या अभ्यास समितीने संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई यांच्या उपरोक्त दिनांक २६ जून १९८४ च्या पत्रासोबत शासनाला सादर केलेल्या अहवालामधील शिफारशींचा शासनाने सम्यक विचार केला आहे. सदर अहवालातील समितीच्या सर्व शिफारशी तत्वतः मान्य करून शासन असे आदेश देत आहे की,—

(एक) जिल्हा कोषागार कार्यालयातील—

(१) आस्थापना शाखा,
(२) राजपत्रित लेखा परीक्षा शाखा,
(३) अराजपत्रित लेखा परीक्षा शाखा,
(४) ठेव शाखा,
(५) शासकीय वचन चिठ्ठया शाखा,
(६) धनादेश शाखा,
(७) गट विमा योजना शाखा,
(८) निवृत्तिवेतन शाखा,
(९) संकलन शाखा,
(१०) संगणक शाखा,
(११) मुद्रांक शाखा,

या ११ शाखांमधील किमान कर्मचारीवृंद व पर्यवेक्षी कर्मचारी/अधिकारीवर्ग या निर्णयासोबत जोडलेल्या विवरणपत्र 'अ' मध्ये दर्शविल्याप्रमाणे असावा.

(दोन) प्रत्येक उप-कोषागार कार्यालयातील किमान कर्मचारीवृंद व पर्यवेक्षी कर्मचारीवृंद या निर्णयासोबत जोडलेल्या विवरणपत्र 'ब' मध्ये दर्शविल्याप्रमाणे असावा.

(तीन) जिल्हा कोषागार कार्यालयांतील ११ शाखांमध्ये अतिरिक्त कर्मचारीवृंद मंजूर करण्यासाठी निश्चित करण्यात आलेले निकष या निर्णयासोबत जोडलेल्या विवरणपत्र 'क' मध्ये दर्शविल्याप्रमाणे असावेत.

याप्रमाणे विहित करण्यात आलेल्या निकषांनुसार राज्यातील प्रत्येक उप-कोषागारामध्ये व जिल्हा कोषागारामध्ये किती अतिरिक्त कर्मचारी/पर्यवेक्षी/अधिकारीवृंद आवश्यक आहे याचा काळजीपूर्वक आढावा लेखा व कोषागारे संचालनालयाने घ्यावा. अशा प्रकारे अनुज्ञेय अतिरिक्त कर्मचारी/पर्यवेक्षी/अधिकारीवृंदासाठी एकंदर किती पदे नव्याने निर्माण करावी लागतील व त्याबाबतचा एकंदर वित्तीय भार (आवर्ती व अनावर्ती) किती पडेल, प्रत्येक उप-कोषागाराची व जिल्हा कोषागाराची निकड लक्षात घेऊन कोणत्या कार्यालयामध्ये किती प्रमाणात कशा प्रकारे किती अवस्थेत (फेज) अतिरिक्त कर्मचारीवृंद शासनाने मंजूर करावा हे संचालकांनी निश्चित करावे व त्याबाबतचे प्रस्ताव शासनास सत्वर सादर करावेत. ज्या पदांसाठी विशेष वेतन देण्याचे तत्वतः मान्य करण्यात आले आहे त्याबाबतचे प्रस्ताव, संचालकांकडून प्राप्त झाल्यावर विशेष वेतनाचे दर नंतर निश्चित करण्यात येतील.

हे आदेश सामान्य प्रशासन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ७४५८/साप्रवि-१८/(कार्यव्यास पथक), दिनांक ३ ऑक्टोबर १९८४ अनुसार मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**वि. द. पत्की**
कार्यासन अधिकारी, वित्त विभाग.

प्रत—
महालेखापाल १ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, महर्षी कर्वे रोड, मुंबई (५ प्रती),
महालेखापाल १ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, महर्षी कर्वे रोड, मुंबई (५ प्रती),
महालेखापाल २ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर (५ प्रती),
महालेखापाल २ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर (५ प्रती),
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई (२५ प्रती),
संचालक, महाराष्ट्र राज्य लॉटरी, मुंबई (२ प्रती),
(विवरणपत्र 'ब' मधील टीप ४ च्या संदर्भात माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी),
अधिदान व लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई (२ प्रती),
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई (२ प्रती),
उप संचालक, लेखा व कोषागारे, पुणे/नाशिक/नागपूर (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी (प्रत्येकी ४ प्रती),
सर्व उप-कोषागार अधिकारी (प्रत्येकी २ प्रती),
सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन १८ (कार्यव्यास पथक) (२ प्रती),
कार्यासन अधिकारी, एडीएम-१, एडीएम-४अ, एडीएम-९, एडीएम-१०, एडीएम-११, एडीएम-१२, एडीएम-१४, एसईआर-७, एसईआर-१०, वित्त विभाग,
शासन निर्णय संग्रह, वित्त विभाग, एडीएम-४,
निवड नस्ती, वित्त विभाग, एडीएम-४,
नवीन पदे निर्मिती संग्रह, वित्त विभाग, एडीएम-४

## विवरणपत्र 'अ'

[शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक ट्रेझरी. ११८४/सीआर-१३८/८४/एडीएम-४, दिनांक २४ मे १९८५ पहा]

जिल्हा कोषागार कार्यालयासाठी निश्चित करण्यात आलेला किमान कर्मचारीवृंद व किमान पर्यवेक्षी व अधिकारीवृंद दर्शविणारा तक्ता

| अ. क्र. (१) | कोषागारातील शाखेचे नाव व अन्य तपशील (२) | किमान कर्मचारीवृंदाचे पदनाम (संवर्ग/श्रेणी) व संख्या (३) | |
|---|---|---|---|
| १ | आस्थापना शाखा (आस्थापना, प्रशासन, निरीक्षण) | रोखपाल (कनिष्ठ लिपिक-विशेष वेतनासह) | १ |
| | | देयक लिपिक (वरिष्ठ लिपिक) | १ |
| | | देयकाव्यतिरिक्त कामासाठी (वरिष्ठ लिपिक) | १ |
| | | टंकलेखक (कनिष्ठ लिपिक) | १ |
| | | आवक लिपिक (कनिष्ठ लिपिक) | १ |
| | | जावक लिपिक (कनिष्ठ लिपिक) | १ |
| | | दफ्तरी (चतुर्थ श्रेणी) (स्वतंत्र) | १ |
